दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक ३१४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.८ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कामानिमित्त जाणाऱ्या पती-पत्नीचा रेल्वे अपघातात मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामानिमित्त जात असलेल्या पती-पत्नीचा रेल्वे अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी सकाळी पेण रेल्वे मार्गावरील रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आपटा स्टेशनपासून काही अंतरावर घडली आहे.

योगेश खंडू जगताप (३१) व रजनी योगेश जगताप (२६) अशी अपघातात मृत्यू झालेल्या पती-पत्नीची नावे आहेत. हे दोघेही आपटा गावातील रहिवासी आहेत. सारसईकडे जाणाऱ्या पुलावरून जात असताना त्यांना रेल्वेने धडक दिल्याने दोघे पती पत्नी नदी पात्रात पडल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने आपटा गावावर शोककळा पसरली आहे.

जगताप जोडपे आपटा गावातील रहिवासी असून नोकरीसाठी सोमवारी सकाळी चालले होते. यासाठी ते आपटा स्टेशनपासून काही अंतरावर असलेल्या सारसईकडे जाणाऱ्या पुलावरुन ते चालले होते. यावेळी रेल्वेने त्यांना धडक दिली. या धडकेत जगताप पती-पत्नी पुलावरुन खाली नदी पात्रात पडले. यात त्यांचा मृत्यू झाला. अपघात झाल्याचे समजताच सामाजिक संस्थेचे अभिजीत घरत, अमित गुजरे, अरूण म्हापणकर, राजेश पारठे, भक्ती साठेलकर, गुरुनाथ साठेलकर, अमोल ठकेकर, स्थानिक ग्रामस्थ मयुर वाडेकर यांनी नदी पात्रात उतरुन दुपारी १२:३० वाजता मृतदेह बाहेर काढले.

# ढाक भैरी डोंगरावर गिर्यारोहकाचा खाली पडून मृत्यू



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत व मावळ तालुक्यातील लोणावळा नजीक असलेल्या ढाक बहिरी या डोंगरावर औरंगाबादच्या गिर्यारोहकाचा खाली पडून मृत्यू झाल्याची घटना घडली.

औरंगाबादचे प्रतीक आवळे, पंकज गावडे, सुजित लहाने, अभिषेक शेजुळ व सागर जयस्वाल हे पाच जण गिर्यारोहणासाठी ढाक भैरी या डोंगरावर आले होते. गिर्यारोहण करीत असताना, प्रतीक आवळे यांचा तोल जाऊन तो खाली पडला व गंभीर दुखापतीमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेचे वृत्त समजताच तुषार महाडिक व भारत रायकर यांनी इतर ट्रेकर्सना सुरक्षित बाजूला नेले. याच दरम्यान मदतीचा कॉल येताच खोपोलीतील यशवंती हायकरचे सर्व जवान, कर्जतमधील संतोष दगडे व त्यांची टीम त्याप्रमाणे सांडशी ग्रामस्थ घटनास्थळी पोहचले.

दरम्यान, प्रतीक व त्यांच्या सहकारी गिर्यारोहकांना डोंगराच्या पायथ्याशी सांडशी गावाच्या दिशेने आणण्यास प्रारंभ झाला. उतार तसेच डोंगरउतार कड्याची अरुंद जागा, या प्राप्त परिस्थितीत दरमजल करीत काळोखी रात्री सर्व जण पहाटे तीनच्या दरम्यान सांडशी गावात पोहचले. त्यानंतर त्यांना कर्जतला आणण्यात आले.

या सर्व मदतटीममध्ये यशवंती हायकरचे पद्माकर गायकवाड, महेंद्र भंडारे, .../२

# रुग्णवाहिकेच्या चालकांचा पगार रखडला

## तीन महिने पगार विना चालक आरोग्य खात्याचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड ग्रामीण रुग्णालयातील १०२ नंबर ॲम्ब्युलन्स गाडीवर काम करणाऱ्या चालकाचे मागील तीन महिन्यापासून वेतन रखडले असून आरोग्य खात्याचे दुर्लक्ष्य झाल्याने या चालकांवर उपासमारीची पाळी आली आहे. वेळोवेळी या चालकांनी वरिष्ठांना कालवून सुद्धा वेतन मिलत नसल्याने हे सर्व चालक हवालदिल झाले आहेत.



ॲम्ब्युलन्स वर चालक असणाऱ्या पनवेल, अलिबाग, रोहा, उरण, कर्जत चौक, महाड, रोहा, आदी तालुक्यातील चालकांना मागील तीन महिन्याचा पगार मिळालेला नाही. त्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावयाचा हा प्रश्न येथे निर्माण झाला आहे.

ग्रामीण रुग्णालयातील १०२ ॲम्ब्युलन्स गाडीचा उपयोग आर.टी.पी.सी.आर सॅम्पल जिल्हा रुग्णालयात घेऊन जाणे, व्हॅक्सिन आणणे, औषधे आणणे, ऑक्सिजन आणणे, व्हॅक्सिनेशन सेंटरवर व्हॅक्सिनची ने-आण करणे, अतितातडीच्या रुग्णास तातडीने जिल्हा रुग्णालय व अन्य हॉस्पिटल मध्ये पोहचवणे, गरोदर मातांना घरातून रुग्णालताय आणणे, तसेच त्यांना प्रसूतीनंतर त्यांच्या घरी सुखरूप सोडणे, आदी स्वरूपाची कामे येथील चालक २४ तास गरज लागेल तेव्हा करीत असतात.

ऍशकॉम मीडिया इंडिया प्रायव्हेट लिमिटेड भोपाळ या कंपनीकडून येथील .../२


## डीवायएसपी तांबे यांनी पोक्सो गुन्हा दाखल करण्यासाठी

# पोलादपूर पोलीस ठाण्याला भेट; आरोपीला अटक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरामध्ये रविवारी दुपारी घडलेल्या बालिका अत्याचाराच्या घटनेतही प्रकरण दाबले जाण्याची शक्यता वाटल्याने काँग्रेस व भाजपाच्या महिला आक्रमक झाल्या. या घटनेनंतर उपविभागीय पोलीस अधिक्षक आयपीएस निलेश तांबे यांनी पोलादपूर पोलीस ठाण्याला भेट देऊन केलेल्या मार्गदर्शनानुसार सदर आरोपी व्यक्तीविरूध्द पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन रात्री उशिरा अटक करण्यात आल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्यातून देण्यात आली.

पोलादपूर शहरातील उत्तरवाहिनी सावित्री नदीच्या पुरामुळे उद्ध्वस्त झालेली पोस्ट ऑफिसची जुनी इमारत मोडकळीस आली असून सध्या वापरात नाही. पोलादपूर शहरातील गंगामाता सभागृहाच्या रस्त्याच्या प्रारंभी असलेल्या मराठी मुलांची शाळा तसेच कन्या शाळेलगत एक टपरी आहे. या टपरीचालकाने एका १० वर्षे २५ दिवस वयाच्या अल्पवयीन मुलीचा बळजबरीने तोंड दाबून जुन्या पोस्ट ऑफिसच्या इमारतीमध्ये नेले आणि एकदा तिला स्वतःच्या अंगाखाली घेऊन तर दुसऱ्यावेळी तिला स्वतःच्या अंगावर ओढून विनयभंग केल्याचे दुष्कृत्य दुपारी एक वाजता या इमारतीमध्ये केले. यावेळी मुलीच्या आरडाओरडीमुळे टपरीचालकाच्या वाईट कृत्याकडे परिसरातील लोकांचे



लक्ष जाऊन लोकांनी त्या मुलीला नराधमाच्या हातून सोडविले आणि त्यानंतर दिवसभर पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये राजकीय आखाडा होऊन सदर मुलीच्या बाजूने तसेच काहींनी त्या टपरीचालकाला वाचविण्याच्या हेतूने प्रयत्न सुरू केले.

यामुळे शहरामध्ये काही तास हे प्रकरण मिटविले जाण्याच्या शक्यतेमुळे नैराश्यपूर्ण संताप व्यक्त होत असताना या सर्व प्रकरणामध्ये होणारा विलंब लक्षात घेऊन महाडचे उपविभागीय पोलीस अधिकारी आयपीएस निलेश तांबे यांनी पोलादपूर पोलीस ठाण्यास भेट देऊन या तपासकामी मार्गदर्शन केले. सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांनी याप्रकरणी स्वतः तपास हाती घेऊन टपरीचालक आरोपी अनंत यशवंत दरेकर (वय ६३, रा.भैरवनाथनगर, पोलादपूर) याच्याविरूध्द लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्यानुसार भा.दं.वि. ३५४, ३५४ (ब) (ड) नुसार गुन्हा र.नं. ०९२०२२ प्रमाणे गुन्हा नोंदविला. याप्रकरणातील आरोपी अनंत दरेकर याला रात्री सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

सदर पिडीत बालिकेची आई घरकाम मोलमजुरी करून उदरनिर्वाह चालवित असून तिचे कुटूंब अनुसुचित जमातीचे आहे. त्यामुळे या गुन्ह्यातील आरोपीविरूध्द पोक्सोप्रमाणे ॲट्रॉसिटीचा गुन्हादेखील दाखल होण्याची आवश्यकता असल्याचे स्थानिक लोकांचे मत आहे. दरम्यान, आरोपीची पोलादपूर शहरातील मुलांची शाळा आणि मुलींच्या शाळेजवळील टपरी हटविण्याची मागणी शहरवासियांमधून होत असून त्यासाठी स्वाक्षरी मोहिम सुरू करण्यात येणार असल्याचे काही राजकीय संघटनांकडून सांगण्यात आले आहे.

या घटनेतील आरोपी हा नवनिर्वाचित नगरसेविकेच्या तसेच सोशल मिडियामुळे विविध सरकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या संपर्कातील व्यक्तीच्या नात्यातील असल्याने सदरचा गुन्हा दाखल न होता दडपला जाईल, अशी साशंकता व्यक्त होत असताना महाडचे डीवायएसपी निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनामुळे पोलादपूर पोलीसांनी कोणताही विरोध अथवा प्रभाव न जुमानता आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करून निष्पक्षपातीपणाचे उदाहरण शहरवासियांना दिले आहे.

## संक्षिप्त...

### मुंबई विमानतळावर चार किलो सोने जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

संयुक्त अरब अमिरातीतून मुंबईत अवैधरीत्या सोने घेऊन येणाऱ्या पाच प्रवाशांना सीमाशुल्क विभागाने नुकतीच अटक केली. या दोन वेगवेगळ्या कारवायांत चार किलो सोने जप्त करण्यात आले असून, त्याचे बाजारमूल्य दीड कोटींहून अधिक आहे. सीमाशुल्क विभागाच्या मुंबई एअर इंटिलिजन्स युनिटने ही कारवाई केली. संयुक्त अरब अमिरातीतून मुंबईत दाखल झालेल्या चार प्रवाशांची तप-ासणी केली असता त्यांनी अवैधरीत्या सोने भारतात आणल्याचे निर्दशनास आले. त्यातील दोघे शारजहाहून जी९-४०१ या विमानाने, तर दोघे अबुधाबीहून ईवाय-२०६ या विमानाने मुंबईत दाखल झाले होते. मेटल डिटेक्टरमध्ये सोने दिसू नये, यासाठी त्यांनी ते भुकटीच्या स्वरुपात आणले होते. चारही प्रवाशांकडून एकूण ३.६ ग्रॅम सोन्याची भुकटी जप्त करण्यात आली. त्याचे बाजारमूल्य १.५६ कोटी रुपये इतके आहे. संबंधित प्रवाशांना सीमशुल्क कायदा १९६२ अंतर्गत अटक करण्यात आली आहे. दुसऱ्या कारवाईत दुबईहून आलेल्या महिला प्रवाशाला अटक करण्यात आली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपास यंत्रणांना चकवा देण्यासाठी तिने सोने अंतर्वस्त्रात लपवून आणले होते. मात्र, सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी तिचा डाव हाणून पाडला. तिच्याकडून ५४६ ग्रॅम सोने आणि ८६८ ग्रॅम सोन्याची भुकटी जप्त करण्यात आली आहे.

# संघर्षाच्या काळात वरसगावची ताकद माझ्या पाठीशी ठामपणे उभी राहिली : खा.सुनील तटकरे



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

माझ्या राजकीय जीवनाची कारकीर्द ही संघर्षाने भरलेली आहे.अशा संघर्षाच्या काळात वेळोवेळी वरसगावची ताकद माझ्या पाठीशी ठामपणे उभी राहिली असल्याच्या आपल्या मनातील भावना खा.सुनील तटकरे यांनी वरसगाव येथे व्यक्त केल्या.

रोहे तालुक्यातील वरसगाव येथील राष्ट्रीय पेयजल अंतर्गत पाईप लाईन दुरूस्ती, आपत्ती व्यवस्थापन व जिल्हा नियोजन अंतर्गत प्रा.शाळेची दुरूस्ती, जिल्हा रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण, पं.स.१५ वित्त आयोग हायमास्ट आदी विकासकामांचा लोकार्पण सोहळा मोठ्या दिमाखात व उत्साही वातावरणात कोकणचे भाग्यविधाते खा.सुनील तटकरे यांच्या संपन्न करण्यात आला. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी जेष्ठ नेते नारायण धनवी, बाबूराव बामणे,रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, जि.प.सदस्य दयाराम पवार, पं.स.माजी सभापती सुनीता महाबळे, पं.समिती सदस्या सिद्धी राजिवले, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला अध्यक्षा प्रितम पाटील, युवा नेते राकेश शिंदे, नरेंद्र जाधव, संजय मांडलुस्कर, मनोज शिर्के, सुशील शिंदे, श्रीकांत चव्हाण, अजित आंब्रुस्कर, उत्तम बाईत, संदीप जाधव, नरेंद पवार, सरपंच विशाखा राजिवले, उपसरपंच दीप्ती सानप, विश्वनाथ धामणसे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी खा.सुनील तटकरे यांनी गावचे चित्र बदलले आहे. राज्यमंत्री अदिती तटकरे व आ.अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून गावात विकास कामांची चालना मिळत आहे. ३१ मार्चच्या आत गावातील प्रस्तावित व्यायाम शाळा उभी करा, साहित्य साठी महेंद्र पोटफोडे मदत करतील, तर सापया मंदिर जवळ असलेल्या नाल्यामुळे भात शेतीचे नुकसान होत असल्याने मी, अदिती, अनिकेत आम्हीं तो ही प्रश्न १००% मार्गी लावू असे अश्वासन दिले. माझ्या राजकीय जीवनाची सुरुवात याच जिल्हा परिषद मतदान संघातून झाली असल्याने स्पष्ट करताना पुढील कालावधीत जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका येत आहेत. गावाचा विकास व्हायचा असेल तर सर्व कार्यकर्त्यानी घड्यालाला १००% मतदान करा आम्ही विकास काय असतो हे दाखवून देऊ असे शेवटी सांगितले.

तर आपले प्रस्तावित भाषणात माजी सरपंच संजय राजिवले यांनी १९९३ पासून तटकरे, पालकमंत्री अदिती तटकरे, व आ. अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातूनच वरसगावचा विकास झाला आहे. त्यामुळे आम्ही वरसगाव ग्रामस्थ आम्ही सदैवच आपल्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले. सापया मंदिराच्या जवळ असलेल्या नाल्यामुळे भातशेतीचे नुकसान होत आहे, त्यामुळे या नाल्याच्या विकासाची मागणी संजय राजीवले यांनी यावेळी केली.

# एक लाख रुपयांसाठी आईने पोटच्या मुलाला विकले

## पनवेल तालुका पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीसह मुलाला घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

'माता न तू वैरिणी' या उक्तीचा प्रत्यय देणारी संतापजनक घटना पुण्यात उघडकीस आली आहे. चक्क आईनेच पोटच्या गोळ्याला एक लाख रुपयांसाठी विकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चार वर्षाच्या मुलाला विकल्यानंतर आईने पोलीस स्टेशनमध्ये अपहरणाची तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरु केल्यानंतर अनेक धक्कादायक माहिती उघड झाली. पुण्यातील कोथरूड परिसरात ही घटना झाली, परंतु सदर मुलाला पळवून नेणारे दांम्पत्य हे पनवेल तालुक्यातील बोर्ले या गावात वास्तव्यास असल्याची माहिती कोथरुड पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने पनवेल तालुका पोलिसांशी संपर्क साधून याबाबत माहिती दिली असता अथक परिश्रम करून अवघ्या २ तासात सदर मुलाला आरोपींसह ताब्यात घेवून त्यांना कोथरुड पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले आहे.



पुण्यातील कोथरूड परिसरातून एका चार वर्षीय चिमुरड्याचे अपहरण झाल्याची तक्रार त्याच्या आईने दिली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून घेतला. त्यानंतर तपासाला सुरुवातही केली. पण या तपासात धक्कादायक माहिती समोर आली. या मुलाच्या आईनेच एक लाख रुपयांत या मुलाची विक्री केल्याचे निष्पन्न झाले. इतकेच नाही तर आईने ज्या व्यक्तीला हा मुलगा विकला होता, त्याने आणखी एका व्यक्तीला त्या मुलाची विक्री केल्याचं समोर आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच आठ जणांना अटक केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. आईने तक्रार दाखल झाल्यानंतर गांभीर्य लक्षात घेऊन तपास आधिक वेगाने सुरु केला. कोथरुड, वारजे आणि उत्तमनगर पोलीस ठाण्यामार्फत ९ तपास पथकांमार्फत चिमुरड्याचा शोध सुरु केला. अपहरण झालेला मुलगा त्याच दिवशी बांगडीवाली भाभीसोबत (जन्नत बशीर शेख) होता, अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्या महिलेला ताब्यात घेऊन तपास सुरु केला. तिची कसून चौकशी केली. सुरुवातीला त्या महिलेनं उडवाउडवीची .../२

# अज्ञात ट्रेलरच्या धडकेने पादचाऱ्यांचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक अज्ञात ट्रेलरच्या धडकेने पादचाऱ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आज सकाळी पळस्पे फाटा परिसरात घडली आहे.

गोवा ते मुंबई लेनवर पळस्पे उड्डाणपुलाच्या अलीकडे असलेल्या पेंटाकास्टल मिशन चर्चच्या समोर तेथील रहिवाशी प्रमोद सरवदे (वय ३६) हा रास्ता ओलांडीत असताना अज्ञात ट्रेलरची धडक त्याला बसल्याने तो गंभीररित्या जखमी होऊन मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अज्ञात ट्रेलर चालकाचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.



# विकासाचा महामार्ग

शहरी भागामध्ये सुविधा पुरवतानाच नागरी जीवन सुखकर करण्यासाठी गेल्या दोन वर्षात नगरविकास विभागाने विविध निर्णय घेतले असून या निर्णयांची अंमलबजावणी करण्यावर विशेष भर दिला आहे. शिवाय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या माध्यमातून अधिक सुखकर प्रवासाकरिता उभारण्यात येणारे रस्ते प्रकल्प विकासाचे राजमार्ग ठरत आहेत.

**एकनाथ शिंदे**
**मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) उंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. म्हणजेच आता पुतळा १३६.६८ मीटर उंचीचा (४५० फूट) करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सुधारित अंदाजित खर्च १०८९.९५ कोटी रुपये अपेक्षित आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील महापौर निवास परिसरातील जागेवर प्रस्तावित केलेल्या स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे राष्ट्रीय स्मारक उभारणीस २८ फेब्रुवारी २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत सुधारित मान्यता देण्यात आली आहे. सुधारित आराखड्याप्रमाणे दोन टप्प्यांमधील कामांसाठी ४०० कोटी रुपयांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केले आहे.

मेट्रोची कामे प्रगतिपथावर

यंदाच्या वर्षी राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी भरीव आर्थिक तरतूद केल्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर येथील मेट्रोची कामे प्रगतिपथावर आहेत. राज्यातील मेट्रो प्रकल्पांसाठी २०२१-२२ या वर्षासाठी ३६९३.१४ कोटी रुपयांची तरतूद मंजूर केली आहे. नागपूर मेट्रो मार्गिकेला उपमार्ग सेवेने जोडण्यासाठी नागपूर शहर आणि परिसरातील भारतीय रेल्वेच्या मार्गांवर आधारित आधुनिक वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन्स सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी महामेट्रोच्या सुमारे ३०५ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास तत्त्वत: मान्यता दिली आहे. पिंपरी-चिंचवड ते निगडी मार्गिका क्र. १-ए या उन्नत मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीस सुधारित मान्यता देण्यात आली आहे.

नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम सुधारणेनुसार नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, तर महानगरपालिका आणि नगरपरिषदेतदेखील बहुसदस्यीय प्रभाग पद्धती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका, नगरपरिषदांमधील निर्वाचित सदस्यांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णयदेखील घेतला आहे.

स्वच्छ सर्वेक्षण : महाराष्ट्र सर्वोत्तम

'स्वच्छ शहर' पुरस्कारामध्ये विटा, लोणावळा आणि सासवड या नगरपालिकांनी देशात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे देशातील एकूण पुरस्कारांच्या ४० टक्के पुरस्कार या वर्षी महाराष्ट्राला मिळाले ही अभिमानाची बाब आहे. फाईव्ह स्टार मानांकनांमध्ये देशातील ९ शहरांमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचा समावेश झाला आहे. नवी मुंबई महापालिका महाराष्ट्राच्या पहिल्या वॉटर प्लस सर्टिफिकेटची आणि सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज द्वितीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

महत्त्वाचे निर्णय

इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ - इलेक्ट्रिक वाहनांकरिता चार्जिंग स्टेशन्स उभारणार्या स्थानिक नाग़री संस्थांमधील नागरिकांना, गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्यात येणार आहे. त्याशिवाय मा. बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीला मालमत्ता करमाफी योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील माजी सैनिकांनादेखील मालमत्ता करातून सूट देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत गेल्या दोन वर्षात १३०१ कोटी रुपये किमतीच्या २३ प्रकल्पांना मान्यता दिली आहे. महानगरपालिका, नगरपरिषदा तसेच इतर नियोजन प्राधिकरणांकरिता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करण्यात आली आहे. प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी आकारण्यात येणार्या अधिमूल्यामध्ये सवलत दिली आहे. ही सवलत सध्या सुरू असलेल्या व नव्या प्रकल्पांना लागू आहे. त्याशिवाय पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बरखास्त करून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे.

अधिनियमात सुधारणा

३१ डिसेंबर २०२० पर्यंत ज्या ठिकाणी गुंठेवारी योजना झाल्या आहेत परंतु त्यांचे नियमितीकरण झालेले नाही त्यांना या अधिनियमातील दुरुस्तीचा लाभ घेता येणार आहे. शासनाच्या ताब्यात आलेल्या ५ टक्के स्वेच्छाधिकार कोट्यातील सदनिका शासकीय विभागांनी मागणी न केल्यास व मागणीशिवाय शिल्लक असलेल्या सदनिका जाहिरातीद्वारे वाटप करण्यासाठी म्हाडाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोरोनावरील उपचारांसाठी मुंबई आणि एमएमआर प्रदेशात आरोग्याच्या जम्बो सुविधांची निर्मिती या विभागाने केली आहे. वांद्रे-कुर्ला संकुल, मालाड (प.), कांजूरमार्ग, कांदरपाडा डेपो, रिचर्डसन व क्रुडास कंपनी परिसरात आणि पनवेल व उरण भागात कोविड हेल्थ सेंटर्स तसेच दहिसर जकात नाका येथे अलगीकरण केंद्र उभारली. कोविडमुळे लावलेल्या कडक निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर अधिकृत फेरीवाले- पथविक्रेत्यांना, अधिकृत सायकल रिक्षाचालकांना दीड हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला.

महामार्गांचे काम प्रगतिपथावर

राज्यातील रस्त्यांचा विकास, बांधकाम आणि देखरेखीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कार्यरत आहे. नागपूर-मुंबईदरम्यान बांधण्यात येणार्या ७०१ कि.मी. लांबीच्या महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्यात आले असून, आजपर्यंत या प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. नांदेड शहरातील रस्ते व गोदावरी पूल ही कामे नांदेड-जालना या १९४ कि.मी. लांबीच्या समृद्धी महामार्ग या प्रस्तावित रस्त्याचा भाग म्हणून घेण्यास मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीने मान्यता दिली आहे. एकूण साडेसहा हजार कोटी रुपये अंदाजित किमतीचा हा प्रकल्प असून नांदेड शहर व परभणी, हिंगोली जिल्हे समृद्धी महामार्गास जोडण्यासाठी लवकरच काम सुरू होणार आहे.

रस्ते प्रकल्पांना गती

मुंबई-पुणे (यशवंतराव चव्हाण) द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ करण्यात येत असून १०.५० कि.मी. लांबीचे २ भुयारी मार्ग आणि २ कि.मी.चे २ लांब पूल अशा ६६९५ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू या १७.१७ कि.मी. लांबीच्या ११ हजार ३३३ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. ठाणे खाडी पूल क्र. ३ या १८३७ मीटर लांबीच्या रुपये ७७६ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू असून विरार ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या नवघर ते बलावली प्रकल्पाच्या (सुधारित) प्रस्तावित केलेल्या ३९८४१.९३ कोटी रुपये इतक्या रकमेस मान्यता दिली आहे. रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा रेवस ते रेड्डी सागरी महामार्ग चौपदरी (फूटपाथसह) सुधारणा करण्यात येणार आहे. भिवंडी-कल्याण-शिळफाटा या २१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या सहापदरी करण्याच्या ३८९ कोटी रुपये किमतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पुण्यात ४ नवे रिंग रोड करण्यात येणार आहे. पुणे पूर्व रिंगरोड भाग ऊर्से (पुणे मुंबई द्रुतगती मार्ग) ते सोलू (आळंदी मरकळ रस्ता), पुणे पूर्व रिंगरोड भाग सोलू (आळंदी मरकळ रस्ता) ते सोरतापवाडी (पुणे सोलापूर रस्ता), पुणे पूर्व रिंगरोड भाग सोरतापवाडी (पुणे-सोलापूर रस्ता) ते बरवे (बु.) (सातारा रस्ता) आणि पुणे पश्चिम भागाच्या रिंगरोड उर्से ते वरवे (बु.) सातारा या मार्गांचा समावेश आहे.

मुंबई ते सिंधुदुर्ग असा रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यास जोडणारा ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती महामार्ग तयार होणार असून, या महामार्गामुळे मुंबईबरोबर कोकणाचे औद्योगिक, पर्यटन व दैनंदिन दळणवळण गतिमान होणार आहे. ग्रीनफिल्ड प्रकल्पासाठी ७१ हजार ३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ही अंमलबजावणी संस्था म्हणून काम करत असून, या प्रकल्पासाठी १०१ कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता दिली आहे.

एकूणच राज्याच्या नागरी भागात पायाभूत सुविधांची भरीव निर्मिती करण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून मोठी कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यातून नागरी जीवन अधिक सुखकर आणि समृद्ध करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले आहे.

**शब्दांकन : किशोर गांगुर्डे,**
**विभागीय संपर्क अधिकारी**

## वसुधा सोसायटी विरोधात विडसई व वाफेघर ग्रामस्थांचे पाली तहसील कार्यालयाबाहेर आमरण उपोषण सुरु

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



सुधागड तालुक्यातील वसुधा सामाजिक उन्नती वनीकरण व वृक्षलागवड संस्थेने वाफेघर व विडसई गावकऱ्यांचे सर्व बंद केलेले रस्ते खुले करावेत, गुरांचे पाणवठ्यावर जाण्याचे व उभे राहण्याची ठिकाण खुली करावीत, तसेच या ठिकाणी होत असलेले अनधिकृत आर सी सी बांधकाम थांबवावे या मागण्या वाफेघर व विडसईतील काही ग्रामस्थांच्या आहेत. त्या पूर्ण होण्यासाठी सुधीर वाघमारे हे ग्रामस्थ सोमवारी (ता.७) पाली तहसील कार्यालयाबाहेर उपोषणास बसले आहेत.

वसुधा संस्थेकडून शासन आदेश व नियमांचे वारंवार उल्लंघन होत आहे. ग्रामस्थांनी येथील अनधिकृत बांधकामा सबंधी १० ऑगस्ट २१ रोजी पाली तहसीलकार्यालयाबाहेर आमरण उपोषण केले होते. या आंदोलनाची दखल घेऊन पाली तहसीलदार यांनी कारवाई करून संस्थेचे अनधिकृत बांधकाम पाडले होते. मात्र प्रशासनाच्या या कारवाईनंतर देखील संस्थेने पुन्हा त्याच ठिकाणी अनधिकृत बांधकाम चालू केलेले आहे. संस्थेने यासंदर्भात शासनाच्या विरोधात उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केलेली आहे.

उच्च न्यायालयात ही याचिका अजून प्रलंबित आहे. त्याचा निकाल लागलेला नसताना संस्था बांधकाम चालू ठेऊन उच्च न्यायालयाचा अवमान करीत असल्याचे उपोषण कर्त्यांचे म्हणणे आहे. वसुधा सामाजिक वनीकरण संस्था स्थापन स्थापन करताना संस्थेचे प्रवर्तक हे त्या परिसरातील १५ किमी (वाफेघर, भैरव, विडसई) येथील असणे आवश्यक होते. मात्र ते प्रवर्तक शहरी भागातील (मुंबई) असल्याचे निदर्शनास येते. याउलट एकही प्रवर्तक अथवा सभासद स्थानिक नाही. प्रवर्तकांचे राहण्याचे ठिकाण व पत्ते खोटे दिले असल्याचे उपोषणकर्त्यांनी सांगितले. आसपासच्या शेतकऱ्यांसाठी शेतीविषयक अथवा वृक्षलागवडी संदर्भात उपक्रम राबविले नसल्याचे उपोषण कर्त्यांचे म्हणणे आहे. तसेच गाव नकाशावर असलेला वहिवटीचा रस्ता बंद करण्याच्या मार्गावर आहे. असे देखील ते म्हणाले.

संस्था स्थापन करून त्यांच्या माध्यमातून हजारो एकर जमीनी खरेदी केल्या जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या सर्व व्यवहारांची ईडी मार्फत चौकशी व्हावी अशी मागणी देखील केली आहे. उपोषणावेळी सुधीर वाघमारे यांच्या समवेत राजेश वाघमारे, ॲड. अमोल कांबळे व गणेश चव्हाण आदींसह विडसई व वाफेघर ग्रामस्थ उपस्थित होते.

## मुंबईकर जिंकले, कोरोनाला पुन्हा हरविले; आता फक्त एकच इमारत सील

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा प्रसारही आता पूर्णपणे नियंत्रणात आला आहे. दररोजच्या बाधित रुग्णांची संख्या साडेतीनशेवर आली आहे. त्यामुळे मुंबईतील चाळी - झोपडपट्टी पाठोपाठ आता इमरतीही प्रतिबंधमुक्त झाल्या आहेत. सध्या मुंबईत केवळ एक इमारत प्रतिबंधित आहे.

मुंबईत २१ डिसेंबर २०२१ पासून तिसऱ्या लाटेचा प्रसार सुरु झाला. या काळात रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत एका दिवसात २० हजार बाधित रुग्ण आढळून येऊ लागले. यामुळे बाधित इमारतींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने पालिकेने नियमात सुधारणा केली. त्यानुसार २० टक्के घरांमध्ये किंवा किमान १० रुग्ण असल्यास इमारती सील करण्यास सुरुवात केली. परिणामी, सील इमारतींचा आकडा कमी होत गेला.

मुंबईत आता रुग्ण वाढीचा दैनंदिन सरासरी दर ०.०९ टक्के आहेत. तर एक हजार ४०७ रुग्णच रुग्णालयात उपचार घेत आहेत. होम क्वारंटाईन रुग्णांची संख्या ६० हजारच्या घरात आहे. त्यामुळे इमारत प्रतिबंधित होण्याचे प्रमाण कमी होत आता केवळ गोवंडी विभागात एक इमारत प्रतिबंधित आहे. तर आतापर्यंत दोन वर्षांच्या कालावधी तब्बल ६६ हजार ३३५ इमारती प्रतिबंधमुक्त झाल्या आहेत.

## दिलखुलास कार्यक्रमात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये यांची मुलाखत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' या कार्यक्रमात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) तथा मुख्य वन्यजीव रक्षक सुनील लिमये यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. ही मुलाखत राज्यातील आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून व 'न्युज ऑन एआयआर' या पवरून मंगळवार दि. ८ फेब्रुवारी, बुधवार दि. ९ फेब्रुवारी आणि गुरूवार दि. १० फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार व निवेदक रणधीर कांबळे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

राज्यात मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये गेल्या काही वर्षात झालेली वाढ, त्याची कारणे आणि अशा घटना रोखण्यासाठी वन विभागातर्फे करण्यात येत असलेल्या उपाययोजना, व्याघ्र व त्यांचे व्यवस्थापन, संवर्धन, राज्यात गेल्या दोन वर्षात नव्याने घोषित करण्यात आलेले संवर्धन राखीव, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान तसेच ठाणे खाडी अभयारण्य यांचे व्यवस्थापन, कोकणात वनविभागातर्फे एका ठिकाणी कासवाच्या पाठीवर बसवण्यात आलेले रेडिओ कॉलर अशा सर्व निर्णयांची व विविध नाविण्यपूर्ण योजनांची माहिती सुनील लिमये यांनी 'दिलखुलास' या कार्यक्रमातून दिली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

### ढाक भैरी डोंगरावर गिर्यारोहकाचा खाली पडून मृत्यू

अरविंद पाटील, अभिजित घरत, सौरभ रावळ, भावेश शिर्के, राजू मोरे, रुपेश जाधव, प्रणित गावंड, संदीप पाटील तसेच कर्जतचे संतोष दगडे व त्यांची टीम त्याप्रमाणे सांडशी गावातील ऋषिकेश कदम, किरण शिर्के, संकेत कदम, संदेश शिर्के, मंगेश तुरडे, रोशन पेडणेकर, हरी ठोंबरे, लखन जाधव, गणेश मुकणे, व गणेश सोमनाथ आदींचा समावेश होता.

### रुग्णवाहिकेच्या चालकांचा पगार रखडला

चालकांना पगार दिला जातोय. परंतु वारंवार तीन चार महिन्याच्या विलंबानंतर सातत्याने फोन केल्यावर एक किंवा दोन महिन्याचा पगार दिला जातो.तोही कधी पूर्ण तर कधी अर्धा पगार या चालकांना मिलत असतो.

या चालकांना मासीक वेतन ८९८३ रुपये दिले जातात. परंतु हा पगार सुद्धा कित्येक महिन्याचा अंतराने दिला जात आहे. केंद्र शासनाने किमान वेतन हे १८ हजार रुपये केले असताना सुद्धा संबंधित ठेकेदार मात्र या चालकांना कमी पगार देऊन त्यांची पिळवणूक करीत असताना सुद्धा वरिष्ठ अधिकारी मात्र मूग गिळून गप्प आहेत. या चालकांना किमान वेतन प्रमाणे पगार मिळणे खूप आवश्यक आहे. परंतु कोणताही अधिकारी या कडे लक्ष्य देत नसल्याने ठेकेदार चांगलाच नफा कमवत असल्याची भावना चालकांमध्ये आहे. आरोग्य मंत्र्यांनी या बाबीकडे गांभीर्यपूर्वक लक्ष द्यावे व चालकांना नियमित व केंद्र शासनाप्रमाणे समान काम समान वेतन मिळावे अशी चालकांकडून मागणी होत आहे.

### एक लाख रुपयांसाठी आईने पोटच्या मुलाला विकले

उत्तरे दिली. पण खाकी दाखवल्यानंतर ती सर्व काही बरळली. ही चौकशी सुरु असताना दुसऱ्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्येही एक महिला मुलाला घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर ताब्यात घेतलेल्या महिलेची कसून चौकशी केली. त्यावेळी तीने गुन्ह्याची कबूली दिली. जन्नत बशीर शेख हिने सांगितले की, रेश्मा सुतार आणि तक्रार करणारी प्रियंका पवार यांच्या संगनमत व कट करुन चिमुकल्याचे अपहरण केलं. हा मुलगा तुकाराम निंबळे, मावळ याच्या मध्यस्थीने पनवेल तालुक्यातील बोर्ले गावात राहणाऱ्या चंद्रकला माळी आणि भानुदास माळी यांना एक लाख रुपयांना विकला. पोलिसांनी तात्काळ या दोघांचा शोध घेतला. यावेळी वपोनि जगताप यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर यांच्याशी संपर्क साधून सदर मोबाईलवरुन फोन लोकेशन हे बोर्ले गाव येत असल्याचे सांगितले. तातडीने रवींद्र दौंडकर यांनी गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश पाळंदे, पोलीस उपनिरीक्षक गजानन टाकळे, सहा.पो.उपनिरीक्षक मनोहर चव्हाण, पो.नाईक राकेश मोकल, पो.शि.भिमराव खताळ यांचे पथक तयार करून त्यांना त्या ठिकाणी पाठवून चंद्रकला माळी आणि भानुदास माळी या दोघांना ताब्यात घेत मुलांबाबत विचारपूस केली. हा मुलगा एक लाख साठ हजार रुपयांना दिपक म्हात्रे यांना विकल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या घरी जावून आरोपीला ताब्यात घेतलं अन् मुलाची सुटका केली. पोलिसांनी भादवि कलम ३७०, ३६८, १२० ब, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. तसेच आठ जणांना ताब्यात घेतलं आहे. या सर्वांना न्यायालयात हजर केले असतान ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने अवघ्या २ तासात या मुलाला शोधून काढल्याबद्दल पुणे परिमंडळ ३ च्या पोलीस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, सहा.पो.आयुक्त गलांडे यांनी वपोनि रवींद्र दौंडकर व त्यांच्या पथकाचे अभिनंदन केले आहे.

## पालीतील कनिष्ठ अभियंता संतान सुदाम पाटील सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्हा परिषद पंचायत समिति सुधागड पाली येथे कार्यरत असलेले संतान सुदाम पाटील कनिष्ठ अभियंता बांधकाम हे नियत वयोमानानुसार वयाच्या ५८ व्या वर्षी ३७ वर्षे सेवा करून नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत.

यावेळी पंचायत समिती सुधागड चे सभापती नंदू सुतार तसेच सुधागड पालीचे गटविकास अधिकारी विजय यादव व गटशिक्षण अधिकारी श्रीमती पवार आणि कर्मचारी वृंद भगिनी उपस्थित होते. प्रथमता श्री मयूर कारखानीस अध्यक्ष ग्रामसेवक संघटना सुधागड पाली यांनी श्री संतान पाटील कनिष्ठ अभियंता यांच्या कार्याचा परिचय दिला.श्री पाटील हे शांत स्वभावाचे व मनमिळाऊ तसेच सर्वांचा आदराने विचारपूस करणारे कर्मचारी असा उल्लेख करून ते स्वतः बीकॉम असून सिव्हिल इंजिनिअर चे काम सांभाळले असून चांगले कार्य पार पाडून सेवानिवृत्त होत आहेत या शब्दात गौरव करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच श्री अहिरे, विस्तार अधिकारी यांनी पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

तसेच तालुका कर्मचारी युनियनचे अध्यक्ष नंदन पाटील यांनी त्यांच्या मनमिळावू स्वभावाबद्दल शुभेच्छा दिल्या. माननीय गटविकास अधिकारी, पंचायत समिती सुधागड पाली विजय यादव, तसेच पाटील हे शांत मनमिळावू स्वभावाचे तसेच कामात कार्यतत्पर असलेले अभियंता उल्लेख करून चांगल्या प्रकारे सुधागड पाली तालुक्याची सेवा केली. कार्यक्रमाच्या शेवटी संतान संतान




शैलेश सोनकर यांनी सेवानिवृत्त पाटील यांच्या एकूणच प्रशासकीय चांगल्या कार्याची पोहोचपावती दिली असून यांच्या कुटुंबाबद्दल देखील कौतुक केले. त्यांची मुले सुसंस्कारक्षम उच्चशिक्षित आहेत असा उल्लेख करून त्यांनी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सभापती नंदू सुतार यांनी संतान पाटील यांनी त्यांच्या ३७ वर्ष सेवेच्या कालावधीत कसे चढ-उतार आले आणि त्यांनी ते कसे सामोरे गेले ह्याबद्दल मनोगत व्यक्त केले, पुढील आयुक्ष जनहित व सामाजिक सेवेस समर्पित करणार असल्याचे संतान पाटील म्हणाले. पंचायत समिती सभापती, गटविकास अधिकारी व उपस्थितांचे आभार मानले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नवीन पनवेल महिला काँग्रेस ब्लॉक कमिटी हळदीकुंकू जल्लोषात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**


काँग्रेस ब्लॉक कमिटीच्या अध्यक्षा सौ. पूजा मोहन ह्यांच्या पुढाकाराने दिनांक ५ फेब्रुवारी रोजी हळदीकुंकू समारंभ व मनोरंजनाचे खेळ आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाला उपस्तीत पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर. सी. घरत, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मलाताई म्हात्रे, महिला काँग्रेस कमिटीच्या तृप्ती शेनोई आणि आरती ठाकूर, पनवेल शहर जिल्हा पर्यावरण विभाग अध्यक्ष सुरेश पाटील, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सुधीर मोरे, नविन पनवेल युवक काँग्रेस उपाध्यक्ष प्रमोद पवार, प नवेल वार्ता च्या पत्रकार, क्रांतिज्योत महिला विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष रुपालीताई शिंदे व पनवेल विधानसभा युवक काँग्रेस उपाध्यक्ष अभिजीत मुंडक्कल खारघर महिला काँग्रेस अध्यक्ष सोनिया व पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेस सरचिटणीस सायरा व खारघर काँग्रेसचे नेते डॉ. स्वप्निल पवार पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्या सर्व ब्लॉक अध्यक्षा व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते हळीकुंकु कार्यक्रमाला नवीन पनवेल मधील अनेक महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्तम प्रतिसाद दिला. सदर कार्यक्रमाला रायगड जिल्हा युवक काँग्रेस अध्यक्ष हेमराज म्हात्रे, पनवेल शहर जिल्हा सेवादल अध्यक्ष राजीव चौधरी, नविन पनवेल शहर ब्लॉक अध्यक्ष राहुल जानोरकर व नवीन पनवेल युवक काँग्रेस सरचिटणीस तुषार पवार व त्यांचे युवक काँग्रेसचे सहकारी आशुतोष चेट्टीयार यांनी विशेष सहकार्य करुन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला व सर्व महिला वर्गाने कार्यक्रमाच्या अध्यक्षा पूजा मोहन यांचे आभार मानले.



# गणेशोत्सवातून जागवीला गड किल्ल्यांचा इतिहास

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील शिवराज युवा प्रतिष्ठान या सामाजिक संघटनेतर्फे दरवर्षी माघी गणेशोत्सव साजरा केला जातो. यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता शासनाचे नियम पाळत सोशल फिजिकल डिस्टन्स पाळत मास्क व सॅनिटायजरचा वापर करत अत्यंत साध्या पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्यात आला. दि ५/२/२०२२ संध्याकाळी ८ ते १० दरम्यान किल्ला म्हणजे काय (किल्ल्याचे अंतरंग व वास्तूची ओळख) या विषयावर अपरिचित गडकोट शोध अभ्यासक, शिवभक्त जयकांत शिंक्रे (पालघर )यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.





डिजिटल चलचित्राद्वारे पडद्यावर विविध किल्ले, किल्ल्याची ओळख अत्यंत उत्तम पद्धतीने जयकांत शिंक्रे यांनी उपस्थितांना करून दिले. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्याच्या दृष्टीने व शत्रूवर विजय मिळविण्याच्या दृष्टीने बांधलेले हौद, कडे, तटबंदी, महादरवाजे, जंग्या, चिरेबंदी, टाके, तलाव, नगारवाडा, प्रवेश द्वारे, घोडे बांधण्यासाठी असलेला पागा,दारुगोळा शस्त्र ठेवण्यासाठी असलेला घर, धान्याचे कोठार,किल्ल्यावर बांधलेले घरे, दादर (पायऱ्या), बुरुज, तोफखाना, गुहा, पायवाट, ढालकाठी, सदर, शिलालेख, भुयारी मार्ग आदी विविध वास्तू, गडकिल्ल्यांचे अंतरंग याविषयी माहिती दिली.शिवभक्त तथा गडकिल्ले अभ्यासक जयकांत शिंक्रे यांनी वाणी आळी उरण शहर येथे शिवराज युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून आयोजित कार्यक्रमात गणेशोत्सवातून गड किल्ल्यांचा इतिहास जागविला.

यावेळी शिवराज युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष संदेश ठाकूर, कार्याध्यक्ष मंगेश वाजेकर, उपाध्यक्ष संगीता ढेरे, सरचिटणीस सचिन भोईर, खजिनदार उमेश वैवडे, सहचिटणीस योगेश म्हात्रे, सहखजिनदार पूजा प्रसादे, शिवराज युवा प्रतिष्ठान गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष धनंजय भोरे, राजेश सरफरे, दिनेश हळदणकर, सुभाष पाटील, सुभाष तांबे, दीपक प्रसादे, सचिन ढेरे, सुयोग ठाकूर, प्रशांत शिरधनकर, केशव निकम, वैदेही वैवडे, अनघा ठाकूर, सुप्रिया सरफरे, छाया तांडेल, अर्चना साळुंखे, सीमा निकम, विशाखा म्हात्रे आदींनी तसेच शिवराज युवा प्रतिष्ठान गड संवर्धन प्रमुख गणेश तांडेल, द्रोणागिरी गड संवर्धन प्रमुख गणेश माळी, सुजित खैरे (डोबिवली), गणेश भोईर, वैभव भोईर, राजा नाईक, कौशिक म्हात्रे, यज्ञेश म्हात्रे, प्रतीक, राज म्हात्रे, रवी म्हात्रे, लक्ष्मण कातकरी, प्रमोद दादा, किशोर दादा, विराज शिरधनकर, इतर गड संवर्धन टीमचे मावळे व सदस्यांनी सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

## वृक्षमित्र सुर्यकांत ठाकूर यांची शासनाने दखल घ्यावी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

वृक्षमित्र सूर्यकांत नरसु ठाकूर यांची शासनाने दखल घ्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दिलीप गडकरी यांनी केली आहे.

अनेकांना वेगवेगळे छंद असतात रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील तिवरे येथील सूर्यकांत ठाकूर यांनी तिवरे गावाच्या परिसरात स्वखर्चाने शेकडो झाडे लावली व जगवली आहेत. अनेक झाडांना संरक्षण जाळ्या बसवल्या आहेत. त्यांच्या या कार्याची तिवरे ग्रुप ग्राम पंचायतीने दखल घेतली त्यांना सन्मान पत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

तहसीलदार, जिल्हाधिकारी, फॉरेस्ट खाते लोकप्रतिनिधी यांनी सुध्दा सूर्यकांत नरसु ठाकूर यांच्या कार्याची दाखल घेऊन त्यांना सन्मानित केले तर त्यांना प्रोत्साहन मिळेलच परंतु इतर अनेकजण वृक्ष लागवड व संगोपन मोहिमेत सहभागी होतील यात शंकाच नाही असे मत दिलीप गडकरी यांनी बोलताना व्यक्त केले.

## काळकाई वृद्धाश्रम गरजूंना आधारवड ठरत आहे

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे-कोलाड मार्गावरील संभे गावाच्या हद्दीत सुरू करण्यात आलेले व सुनंदा मोहिते सामाजिक संस्थेचे श्री. काळकाई प्रसन्न वृद्धाश्रम गरजूंना आधारवड ठरत असल्याची प्रतिक्रिया सेवानिवृत्त मुख्याध्यापक अविनाश म्हात्रे खांब यांनी दिली आहे.



चांगली सेवा व जपत असलेल्या आपलेपणाने अल्पावधीतच सदरचे वृद्धाश्रम नावारूपाला आले असून येथे दाखल केलेल्या वृद्धांच्या नातेवाईकांना अतिशय चांगले अनुभव आले आहेत. अंथरूणात झोपलेले,शक्ती व त्राण वयोमानानुसार कमी झालेल्या वृद्धांसाठी राशन, लाईटबील, भाजीपाला, फळे या सर्वांचा अतिशय कमी प्रमाणात मोबदला घेऊन येथे वृद्धांना प्रवेश दिला जात आहे. तसेच येथे ज्या आजी-आजोबांना पोटासाठी जेवण मिळत नाही,आजारपणासाठी औषध मिळत नाही, अशा वयोवृद्धांसाठी मोफत आसरा व निवारा याची मोफत व्यवस्था केली जात असल्याचे सांगतानाच जेवण भरविणे, डायपर लावणे, लहान मुलांसारखे जेलण भरविणे अशा प्रकारची सेवा सुनंदा मोहिते आणि त्यांचे सर्व सहकारी आपुलकीने करीत असल्याचे शेवटी सांगितले.

सेवा हे ब्रीद घेऊन व कोणत्याही प्रकारच्या फळाची अपेक्षा न करता केवल वयोवृद्धांच्या सेवेसाठी तत्पर असलेल्या या वृद्धाश्रमात आतापर्यंत समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटी देऊन व इथे चाललेल्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले आहे. तर सामाजिक बांधिलकी जपून समाजाची खरी गरज ओळखून संचालिका सुनंदा मोहिते व त्यांचे सर्व सहकारी यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल समाजातून चांगल्या प्रतिक्रिया ऐकावयास मिळत आहेत.

## वैश्यवाणी- एक हात मदतीचा तर्फे हळदी कुंकू समारंभ साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील वैश्य समाज हॉल येथे वैश्यवाणी एक हात मदतीचा या संस्थेतर्फे हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी अशोक भोपतराव (रायगड जिल्हा वैश्यसमाज अध्यक्ष), श्यामल आंग्रे (रायगड जिल्हा महिला अध्यक्ष), सुनील शेट्ये (पनवेल तालुका वैश्य समाज अध्यक्ष), अंजना मनोरे(पनवेल महिला अध्यक्ष), माधवी चौधरी(कळंबोली महिला अध्यक्ष),विजया चौधरी (कार्यक्रम अध्यक्ष) प्रदीप (बापू) दलाल(अध्यक्ष), योगेश तांबोळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



पनवेलसह आजूबाजूच्या परिसरातील वैश्यवाणी समाज एकत्र यावा व त्यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे यासाठी वैश्यवाणी -एक हात मदतीचा तर्फे हळदी कुंकू समारंभाचे आयोजन पनवेल येथे करण्यात आले होते. या समारंभाला महिलांची विशेष उपस्थिती होती. वाण देऊन महिलांना सन्मानित करण्यात आले. या समारंभात उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी वैश्यवाणी समाजाने एकत्र यावे यासाठी प्रयत्न करायला हवेत असे सांगितले. तसेच एकत्र येऊन वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम राबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यावेळी संस्थापक अध्यक्ष योगेश तांबोळी, संस्थेचे अध्यक्ष प्रदीप (बापू) दलाल, उपाध्यक्ष हर्षला तांबोळी, सचिव मयूर तांबडे, सहसचिव अंकिता आंग्रे, खजिनदार विजयकुमार तांबोळी, संतोष चौधरी, दीपक जगे, जयेंद्र शेटे, अभिषेक तांबोळी, कमलेश चौधरी, पंकज तांबडे यांच्यासह अनेकांनी मेहनत घेतली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अशोक भोपतराव यांनी मत मांडताना त्यांनी सांगितले की, ज्या वृद्धांना त्यांची मुले सांभाळत नाहीत अशा वृद्धांसाठी आपण एक अनाथाश्रम चालू करणार आहोत अशी या वैश्य वाणी- एक हात मदतीचा या संस्थेची संकल्पना आहे. तीला माझा संपूर्णपणे पाठिंबा असेल शिवाय त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये हेही नमूद केले की, वृद्धाश्रम ऐवजी अनाथाश्रम हे नाव दिला आहे ते नक्कीच सार्थकी ठरेल. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा विजया संतोष चौधरी यांनी आपले मत मांडताना स्त्री विषयीची भूमिका कशी असते याबद्दल उहापोह केला .स्त्री म्हणजे कोणाची तरी माता-भगिनी, बहिण, पत्नी असते. अशा ह्या अनेक भूमिका बजावत असताना आज देखील त्या स्त्रीला म्हणजेच जन्माला येणाऱ्या मुलीला जन्माला येण्यापुर्वीच मारलं जातं. आज खऱ्या अर्थाने स्त्रीभ्रूण हत्या या विषयावर आपल्याला चर्चा करण्याची गरज आहे. अशा आणि अनेक विविध पैलूंवर विजया चौधरी यांनी भाष्य केले आहे.

## दिव्यांग शिक्षकाची विना अट बदली करावी : साईनाथ पवार

**दै.रायगड नगरी । तळा**

राज्यात दिव्यांग शिक्षकांच्या बदल्या व इतर समस्या प्रलंबित आहेत. त्याकडे शासन लक्ष देत नसल्याने अनेक वेळा या समस्या निदर्शनास आणून हि दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत असून महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना आक्रमक होण्याच्या तयारीत आहे त्यासंदर्भात असणाऱ्या अटी दिव्यांग कर्मचाऱ्यांना जाचक ठरत आहेत विना अट बदली करावी अशी मागणी राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांनी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा काळ असून ऑनलाईन शिक्षणासह सर्व माहिती दयावी लागते किवा कामकाज करावे लागत आहे. मात्र रोस्टर प्रमाणे जिल्हा वार दिव्यांग (अपंग) शिक्षक जागा किती? त्याची आकडेवारी नाही.त्यामुळे जातवार रिक्त पदे भरली जातात. अपंग असूनही संवर्ग१ असून फॉर्म भरला तरी बदली होत नाही. एखाद्याकडे ना हरकत दाखला असून सुद्धा त्यांना फक्त एकच एन् ओ सी किंवा संवर्ग१ मध्येच फॉर्म भरावा लागत असल्याने एन् ओ सी अंतर्गत रिक्त जागा असूनही बदली केली जात नाहीम्हणून सिंगल एन् ओ सी टॅब मध्येअपंग हा सब टॅब असणे आवश्यक आहे. तसेच एन् ओ सी आहे कि नाही याबाबत उल्लेख करण्याची सोय असावी. कन्नड रोस्टर पुर्ण नसल्याने२०१७ पासून एकही शिक्षक बदली झाली नाही. हि गंभीर बाब आहे. कन्नड अल्पसंख्याक असल्याने जि.प.अधिकारी वग्रामविकास विभाग अखेर मराठी रोस्टर पुर्ण होताच कन्नड वगळून बदली होत आहे हा अन्याय केला जात आहे.तसेच त्यांच्या सोयीनुसार बदली केली जावी. संपूर्ण राज्यात अपंग जागा किती या बाबत ऑनलाईन पोर्टला माहिती भरली जात नसल्याने त्यांच्या बदल्या होत नाहीत तरी स्वंतत्र बदली प्रक्रिया राबविण्यात यावी दिव्यांग शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत तीन वर्षाची अट शिथील करण्यात यावी. अशी रास्त मागणी निवेदनात केली आहे.

## १० लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेक्टर ६ खारघर येथील महेंद्रकुमार मदनलाल बिसेन हे बँक ऑफ बडोदा येथे चीफ मॅनेजर म्हणून काम करतात. त्यांचा वोडाफोन आयडिया कंपनीचा नंबर ब्लॉक झाला होता. त्यांनी गॅलरी मध्ये जाऊन चौकशी केली असता त्यांचे सिमकार्ड कोलकाता, पश्चिम बंगाल येथुन ब्लॉक झाले असल्याचे समजले. ब्लॉक करण्याचे कारण त्यांनी मोबाईल हरवला असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांनी त्याच सिम क्रमांकाचे दुसरे सिमकार्ड घेऊन मोबाईल चालू केला. मोबाइल चालू केला असता बँक ऑफ बडोदा खारघर सेक्टर १२ येथील शाखेतून त्यांना इंटरनेट बँकिंग आणि ओवरड्राफ्ट खात्यामधून एकूण ९ लाख ९६ हजार लाख रुपये कमी झाल्याचे समजले.

मा.गोडसे साहेब
प्रो.जमा रु.५०/-
वारस दाखला

अर्जदारातर्फे वकील
ॲड.कैलास घरत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, पनवेल वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/०३/२०२२

१) श्रीमती.वासंती मनोहर म्हसकर
वय : ४९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.ओमकार मनोहर म्हसकर
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.आविष्कार मनोहर म्हसकर
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
१ ते ३ रा.वरचे ओवळे, पो.पारगांव,
ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.मनोहर मारुती म्हसकर यांचा मृत्यू दि.२५/०७/२०२१ रोजी हिरानंदनी फोर्टीस, हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई येथे झालेला आहे. सबब कै.मनोहर मारुती म्हसकर यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदार क्र.१ ते ३ हेच वारसदार आहेत.

कै.मनोहर मारुती म्हसकर हे हयात असताना त्यांच्या ताबेकब्जा वहिवाटीत कसवणुकीत आणि मालकी हक्कात असलेले खालील वर्णनाची जमीन व घर मिळकत आहे. त्या जमीन व घर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७० | ३+४+५/सी | ०-१०-४ | | | |
| २ | ७४ | ०३ | ०-०१-३ | | | |
| ३ | ७४ | ०६ | ०-४६-८ | | | |
| ४ | ७५ | ०८ | ०-२१-० | | | |
| ५ | ७५ | ९ अे | ०-४३-० | | | |
| ६ | ४० | ११ | ०-०९-० | | | |
| ७ | संचिका क्र. | अनुज्ञेय क्षेत्र | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
| | VOV&ICIG-47 | ७३.६३ | पुष्पक/वडघर | ०१ | १८८ | २३० चौ.मी. |

सदर वरील संपादीत मिळकत क्र.१ ते ०६ चे युनिट केस क्र. ओवळे -२३१ हे कै.मनोहर मारुती म्हसकर व सहहिस्सेदार यांचे सामुहिक नावे झालेले आहे. व संपादीत मिळकत क्र.०७ चे युनिट केस क्र.व्हीओव्ही-आयसीआयजी-४७ हे कै.मनोहर मारुती म्हसकर यांचे नावे झालेले आहे. वरील मिळकती व मिळकतीच्या अनुषंगाने मिळणाऱ्या भूखंडा संदर्भात व इतर फायदे याकरिता अर्जदार यांना वारस दाखला मिळणे करिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांना वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२८/०१/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

## अल्पवयिन मुलीला पळवून नेणाऱ्यास पनवेल शहर पोलिसांनी घेतले ताब्यात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे येथे राहणाऱ्या एका १७ वर्षीय अल्पवयिन मुलीस फुस लावून तिच्या कुटूंबियांच्या संमतीशिवाय लग्न करण्याचे अमिष दाखवून पळवून नेणाऱ्या इसमास पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने उत्तरप्रदेश येथून ताब्यात घेतले आहे.

करंजाडे येथे राहणारी १७ वर्ष ६ महिन्यांच्या मुलीला कुर्ला रेल्वे स्थानक येथे बोलावून त्यांनंतर तिला सूरत, अहमदाबाद व नंतर उत्तरप्रदेश येथील अखंडनगर, जि.- सुलतानपूर या गावी आरोपी विकास मिश्रा हा घेऊन गेला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सुनिल गिरी, पोना रविंद्र पारधी व महिला पोलिस शिपाई सुनिता गोलावर आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे व गुप्त बातमीदारांच्या मदतीने त्याचा माग काढून त्याच्या मूळ गावी अखंडनगर येथे जाऊन सापळा रचून त्याला ताब्यात घेतले व त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे सदर अल्पवयिन मुलीलासुद्धा ताब्यात घेऊन सुखरूप पनवेल शहर पोलिस ठाण्यात आणले आहे. त्यानंतर शासकीय सोपस्कार पूर्ण करून सदर मुलीस तिच्या कुटूंबियांच्या ताब्यात देणार आहे.

## ममदापुर येथील कब्रस्थान संरक्षण भिंत बांधणे याकरिता ३८.९० लक्ष निधी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या मौजे ममदापुर येथील कब्रस्थान संरक्षण भिंत बांधणे याकरिता ३८.९० लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.

नेरळ प्राधिकरण हद्दीतील मौजे ममदापुर येथे मोठ्या प्रमाणात मुस्लिम वस्ती असून तेथील नागरिकांची वारंवार कब्रस्थान साठी संरक्षण भिंत व्हावी ही मागणी करण्यात येत होती, सर्व घटकाला समान न्याय देणारे तसेच समाजाचा विकास व्हावा या दृष्टीने प्रयत्न करणारे राजिप उपाध्यक्ष यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मौजे ममदापुर येथे कब्रस्थान संरक्षण भिंत बांधणे या कामासाठी ३८.९० लक्ष निधी मंजूर केला आहे, कामाचे भूमिपूजन रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रा.जि.प. माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, बंधू देशमुख, दामतचे सरपंच जबिरभाई नजे, महिलाध्यक्षा ॲड.रंजना धुळे, दामतच्या उपसरपंच नयना आखाडे, वदपच्या माजी उपसरपंच मनीषा पाटील, कविता शिंगवा, वीरेंद्र जाधव, प्रसाद भोपतराव, इम्तियाज पौंजेकर आदी उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र.एमएच-४६-बीई-५४१६ चे मालक निखिल नंदन मते यांचे तारीख १६/०१/२०२१ रोजी निधन झालेले आहे.

निखिल नंदन मते, पत्ता : सावळा मार्ग, सोमटणे, कसळखंड, पनवेल, रायगड-४१०२०६ येथे राहण्यास होते.

उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी मी नंदन नामदेव मते असल्यामुळे सदर वाहनाचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार त्या वाहनाचे माझे (नंदन नामदेव मते) नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे / प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे / प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत खालील सही करणार यांच्याकडे नोंदवावी.

सही/-
श्री.नंदन नामदेव मते
सावळा मार्ग, कसळखंड, सोमटणे,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस व्दारे तमाम जनतेस कळविणेत येते कि, आमचे अशिल श्री संतोष जयराम गिरकर रा.लक्ष्मी निवास,दत्त मंदिर जवळ,प्लॉट नं.ए-८१/३१, सेक्टर-१२, खारघर, नवी मुंबई ४१०२१० खालील वर्णानाची मिळकत आमचे अशिलांचे मालकी व वहीवाटीचे आहेत. खालील नमुद मिळकतीचे मुळ कागद पत्रे आमचे अशिल यांचे कडुन गहाळ झाली आहेत.

**मिळकतीचे वर्णन:-**
**मे.सुंदरजीवन को.ऑप हौसीग सोसायटी लि.प्लॉट नं.सी-६, युनीट नं.१३, सेक्टर-६, नवीन पनवेल (पु), ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्रफळ-३२.00 चौ. मीटर.**

१) शेअर सर्टीफिकेट
२) वाटप पत्र (Allotment Letter)
३) बॅक ऑफ इंडिया यांचे कडील १२/०१/१९९६ रोजीचे चलन.

त्यासंदर्भात आमचे अशिलानी खारघर येथे दिनाक ०१/०२/२०२२ रोजी तक्रार केली आहे.त्याचा तक्रार क्र ०२३६/२०२२ असा आहे.

तरी याबाबत कोणाहि व्यक्तीस वरील कागदपत्रे आढळल्यास खालील पत्यावर कागदपत्रा सहित समक्ष भेटावे.

दि. ०७/०२/२०२२

सही/-
रेखा के. होवाळे
शॉप नं.१३, प्रभात सेंटर,
सेक्टर १ ए, सी.बी.डी.बेलापूर

# संक्षिप्त...

## भाजपच्या आधार- पॅन- कोविड-१९ कार्ड युनिव्हर्सल पास वाटप उपक्रमाला मुरुड मधील नागरिकांचा स्वयंस्फुर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पक्षातर्फे ज्येष्ठनेते तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य जनार्दन सदाशिव तथा आण्णा कंधारे यांच्याहस्ते भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त शनिवार दि.५ व रविवार दि.६ फेब्रुवारी २०२२ रोजी दोन दिवसीय आधार–पॅन स्मार्ट कार्ड, युनिव्हर्सल पास तसेच हेल्थ, ई–श्रम व कोविड–१९ कार्ड चे मोफत वाटप कार्यक्रमाला मुरुड मधील नागरिकांचा स्वयंस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून अलिबाग–मुरुड मतदार संघाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड.महेश मोहिते यांनी प्रत्यक्ष भेट देऊन उपक्रमाचे कौतुक व अभिनंदन केले.कोरोना – ओमायक्रॉन रोगाच्या पार्श्र्वभूमीवर शासनाच्या अटि शर्ती व नियमांचे पालन करण्यात येऊन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.ज्येष्ठनेते आण्णा कंधारे व तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. भा.ज.पा.चे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे, तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर उपाध्यक्ष बाळा भगत, शहर अध्यक्ष उमेश माळी, सरचिटणीस नरेश वारगे, शैलेश काते, अभिजित पानवलकर, महेश मानकर, सुनील खेऊर, किशोर म्हसळकर, महिला अल्पसंख्याक अध्यक्षा नसिम उलडे, हनिफ उलडे, प्रतिभा गायकर,श्रद्धा गायकवाड, शुभांगी माळी, भाग्यश्री भगत आदी. मान्यवर उपस्थित होते.

शहरातील ८०० हून अधिक नागरिकांनी या कार्ड व पास वाटप कार्यक्रमाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुणे – येरवडा येथील ट्रस्ट फाऊंडेशन अध्यक्ष रणजित थोरवडे, सचीव उत्कर्ष राजेशिंदे, श्रीनिवास वाघमोडे, यशराज जाधव यांचे सहकार्य लाभले.



# माथेरानमध्ये पक्षांतर्गत कुरघोड्या सत्ता स्थापन करण्यास घातक ठरणार?

## नेतेमंडळीना अति आत्मविश्वास भोवणार ; राजकीय विश्लेषकांचे मत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानच्या सक्रीय राजकारणात इन मिन तीन पक्ष कार्यरत असून यामध्ये काँग्रेस, शिव–सेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हेच पक्ष सध्यातरी प्रमुख पक्ष समजले जातात. परंतु यांच्या तोडीला तोड म्हणून काही महिन्यांपूर्वी शिवसेने मधील एकूण दहा लोकप्रतिनिधींचा भाजप मध्ये पक्षप्रवेश झाल्याने आगामी निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आपली ताकद पणाला लावणार यात दुमत नाही. यातील काही पक्षामधील आपापसात असणारे मतभेद आजही चव्हाट्यावर आलेले दिसत आहेत. पुढील सत्तेचे दावेदार आपणच असणार या अविर्भावात सुध्दा काही मंडळी आजही कायम आहेत.



विशेष म्हणजे ज्यांनी यावेळी राजकीय संन्यास घ्यायला हवा होता तीच मंडळी सध्यातरी खूपच ॲक्टिव्ह होताना दिसत आहेत. ज्यांना आजमितीपर्यंत स्वतःच्या कर्मधर्मसंयोगाने राजयोग प्राप्त झाला नाही. सोबत कुणीही पाठीराखे कार्यकर्ते नसताना सुध्दा अशाच मंडळींनी प्रामुख्याने राजकीय क्षेत्रात शिरकाव करत पक्षांतर्गत कुरघोड्या आणि आपापसात हेवेदाव्याचे निर्माण केलेले चित्र केवळ स्वतःची पोळी भाजून घेण्यासाठी अशा कुरापती करण्यास सुरुवात केली आहे. आणि हेच कारण नेतेमंडळीना आगामी निवडणूक काळात सत्ता स्थापन करण्यासाठी खूपच घातक ठरणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे. काही पक्षांत साधे सोशल मीडियावर साथ देण्यासाठी सुद्धा कार्यकर्ते उपलब्ध नाहीत. आणि विशेष म्हणजे पक्षाची पदे असताना सुध्दा अन्य पक्षांच्या नेतेमंडळीना शुल्लक रक्कमेसाठी इत्यंभूत खबरी पुरविण्यात धन्यता मानत आहेत.ही सध्याची इथली वस्तुस्थिती आहे. निवडणूक काळात सोबत कार्यकर्ते असावेत यासाठी काहींनी ज्यांना सर्व स्तरावर जनमत शुन्य आहे अशांना सुध्दा पुनर्जीवित केल्यामुळे काही नेत्यांनी हे विकतचे दुखणे घेतलेले आहे.कोणत्याही परिस्थितीत आम्हीच सत्ता स्थापन करणार हा अति आत्मविश्वास सुध्दा भोवण्याची शक्यता नाकारता येत नाही असे जाणकार मंडळीं मधून बोलले जात आहे. गटातटाच्या राजकारणामुळे कार्यकर्ता विखुरला जात आहे कुणाचा झेंडा खांद्यावर घ्यायचा हा यक्षप्रश्न त्यांना सतावतो आहे. अद्याप आरक्षण जाहीर झालेले नाही तरीसुद्धा अगोदरच युत्या आघाड्या अप्रत्यक्षपणे स्वयंघोषित केल्या जात आहेत. सद्यस्थितीत मागील काही वर्षांपासून दर पाच वर्षांनी होत असलेल्या निवडणूका आणि त्यानंतर सभागृहातील सर्व व्यवहार मतदारांना ज्ञात होत आहेत. याच वेळी राजकीय इतिहासात पहिल्यांदाच पक्षाच्या उमेदवारांना मतदारांनी निवडून दिलेले असताना आर्थिक लोभापायी काही लोकप्रतिनिधींनी बंडखोरी करत मतदारांशी केलेली बेईमानी जगजाहीर झाली आहे त्यामुळे मतदार सुध्दा खूपच उद्विग्न झालेले दिसत आहेत.

अन्य पक्षातील महत्वकांक्षी मंडळींना जवळ केल्यामुळे जे खरोखरच निष्ठेने काम करतात त्यांचा भ्रमनिरास झालेला प्रकर्षांने जाणवत आहे. काँग्रेस पक्षाने काही महिन्यांपूर्वी आगामी निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली होती. परंतु जर कुणी युती अथवा आघाडीच्या माध्यमातून सोबत येणार असतील तर त्यांच्या साथीने अर्थातच काँग्रेस पक्षाशी समविचारी असणाऱ्या पक्षाशी आघाडी करण्यास काँग्रेस पक्ष तयार असल्याचे अधिकृतपणे बोलले जात आहे. एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अनेकदा सत्तेत विराजमान झालेला पक्ष असून यावेळी शिवसेनेतील एक गट त्यांना सोबत घेऊन येत्या निवडणुकीची वाटचाल करणार आहेत तर शिवसेनेचा दुसरा गट ज्यामध्ये जेष्ठ शिवसैनिक कार्यरत आहेत तो गट काँग्रेस, आणि भाजप पक्षासोबत आगेकूच करणार आहे असेही बोलले जात आहे. शिवसेनेतील जेष्ठ कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की २०१६ ची निवडणूकीत स्वबळावर एकहाती सत्ता स्थापन केली होती मग यापुढे कोणत्याही पक्षाच्या आधाराची आवश्यकता नाही आमची स्वबळावर लढण्याची तयारी आहे. तर दुसऱ्या गटातील शिवसेनेचे कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवत आहेत. त्यामुळे गटातटाच्या राजकारणात कार्यकर्ता दुरा–वला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिवसेनेच्या दोन्ही गटांना एकसंध करण्यासाठी वरीष्ठ पातळीवरून अद्याप काही हालचाली दिसत नाहीत.

# ग्रामीण भागात भाजीपाल्याचे दर वधारले

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील मुख्य बाजारपेठत भाजीपाल्याचे दर महागल्याने येथील व्यावसायिकांसह सर्वसामान्यांचे बजेट कोलमडून गेले आहे. अवकाळी पाऊस आणि इंधन दरवाढ या मागील कारण सांगण्यात येत असून आता पेट्रोल – डिझेल या इंधनापेक्षा ही जादा भावात असणारी शेवग्याच्या शेंगांनी चांगलाच भाव खाला आहे.

श्रीवर्धनमध्ये पर्यटन व्यवसाय सोबतच कौटुंबिक बजेट भाजीपाला दरावर अवलंबून आहे. मात्र, नियमित खाद्यामध्ये वापरात येणाऱ्या बटाटा, वांगे, कांदे, हिरवी मिरची, काकडी, टोमॅटो या पदार्थांच्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. वेळेला बाजारात शेवग्याच्या शेंगांचा तुटवडा होत असल्याने 'आता महाग तर महाग पण भाजीपाला तर आणाल का?' असा त्रासिक सवाल गृहिणींमधून पुढे येत आहे.

पुणे किंवा इतर जवळील भाजीपाला मार्केटमधून २०० किलोमीटर अंतराहून येथील परिसरातील भाजी विक्रेत्यांना नियमित मालाची आवक होत असते. गेल्या काही दिवसापासून भाजीपाल्याची आवक काहीशी कमी झाल्याचे चित्र आहे. परिणामी, दर्जेदार मालास अधिक भाव मिळत आहे. मार्केटमध्येच भाजीपाल्याची आवक काहीशी मंदावल्याचे चित्र आहे. परिणामी, शेवगासह अन्य फळभाज्यासह कांदा, बटाट्याचे भाव वधारले आहेत.

शेतकरी बांधवाना देखील यंदा अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. त्यात इंधन दर वाढ केल्यामुळे त्यांना देखील महागाईचा फटका बसला आहे. त्यामुळे त्यांच्या भाजीला व्यापारी वर्ग कमी दरात घेतो. असे काही चित्र स्पष्ट होत असले तरी यंदा भाजीपाल्याची आवक मोठ्या प्रमाणात घटली असल्याने अनेक भाज्यांचे भाव वधारले आहेत.



# स्वा.सु.अलिबागकर महाराजांचा १८ फेब्रु. रोजी पुण्यस्मरण सोहळा

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

समस्त कोकण प्रांतात वारकरी सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करून समाजाला सद्मार्गाला लावणारे अधुनिक संत महात्म्ये स्वा. सु.सद्गुरू गणपत बाबा अलिबागकार महाराजांचा यांचा ५४ वा पुण्यस्मरण सोहळा कासार घाट पंढरपूर येथे संपन्न होत आहे. या निमित्ताने अखंड विश्वशांती हरिनाम सप्ताह ११ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत साजरा होणार आहे. पहाटे ४ ते ६ श्रींची काकड आरती भजन ६. ३० नित्य पूजा ९ ते १३. ३० जगत गुरु श्री तुकाराम महाराज गात्यावरील भजन दु १ ते ४ भोजन सायं ४ ते ५ प्रवचन ५ ते ६. ३० हरिपाठ रात्री ७ ते ९ श्री हरी कीर्तन व जागर १८ फेब्रुवारी रोजी सकाळी महाराजांच्या पुण्यस्मरण निमित्त पहाटे श्रींची महापूजा सकाळी ८ ते १० दिंडी प्रदक्षिणा १०. ३० ते १२. ३० कीर्तन व महाप्रसाद १९ फेब्रुवारी रोजी १० ते १२ काल्याचे कीर्तन आदी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आलेले आहे भाविकांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित राहून तन मन धनाने श्री सद्गुरूंची सेवा करावी असे विनम्र आव्हाहन संत चरण रज अबप नारायणदादा गोपाळबुवा वाजे अलिबागकार महाराज यांनी केले आहे.

# श्रीवर्धनला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित हळदीकुंकू व होममिनिस्टर कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने श्रीवर्धन येथे आयोजित केलेल्या हळदीकुंकू व होममिनिस्टर कार्यक्रमाला महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला.

शहरातील नगरपालिका शाळा क्रं .१ येथे दिं ५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हळदीकुंकू कार्यक्रमाला महिलांची उत्स्फूर्त उपस्थति होती याच कार्यक्रमात पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रमाला सुमारे १८०० महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. खूप सुंदर नियोजन बद्ध खेळात होम मिनिस्टरचा मान सौ इशा आतिष भोकरे यांना मिळाला. भोकरे यांना मानाची पैठणी ना.अदितीताई तटकरे व प्रमुख पाहुण्या सिने अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.





उपविजेत्या सौ.सुरेखा चित्ते यांना चांदीची नथ बक्षीस देण्यात आली. तसेच उत्कृष्ठ उखाणा ठरलेल्या सो रिद्धी करंजकर यांना देखील बक्षीस देण्यात आले, तर सहभागी सर्व स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाला आलेल्या पाहुण्या सिनेअभिनेत्री प्राजक्ता माळी व ना.अदिती तटकरे यांच्यासोबत फोटो काढण्यासाठी लहान मुली तसेच महिलावर्गाची झुंबड उडाली होती. शिस्तबद्ध सुनियोजित कार्यक्रम श्रीवर्धन कारणांसाठी राबविल्याने महिला वर्गात आनंदाचे वातावरण पाहायला मिळत होते, तसेच ना.अदिती तटकरेंना धन्यवाद देत होते.

# नागोठण्यात भाजपा महिला मोर्चाच्या वतीने हळदी कुंकू समारंभ उत्साहात

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करत भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या वतीने नागोठणे येथील शांतीनगर भागात असलेल्या संपर्क कार्यालयासमोरील प्रांगणात नुकतेच हळदी कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड उपाध्यक्षा वैशाली मपारा, दक्षिण रायगड उपाध्यक्षा श्रेया कुंटे, मेघना ओक, सुधागड महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष आरती भातखंडे, यशोधरा गोडबोले, रोहा शहर महिला मोर्चा अध्यक्षा ज्योती सनलकुमार, उपाध्यक्षा संस्कृती ओक, पाली नगरपंचायतीच्या नगरसेविका जुईली ठोंबरे, पाली शहर महिला मोर्चा अध्यक्षा सई लवाटे, चिटणीस योगिनी भातखंडे, निहारीका शिर्के, रोहा तालुका उपाध्यक्षा अपर्णा सुटे, महिला मोर्चा तालुका उपाध्यक्षा माधुरी रावकर, तालुका चिटणीस निलिमा राजे यांच्यासह नागोठणे शहर महिला मोर्चा अध्यक्षा शितल नांगरे, उत्तर भारतीय सेल महिला मोर्चा शहर अध्यक्षा सोनी पाण्डेय, नागोठणे विभाग सरचिटणीस मुग्धा गडकरी, रेवती जांबेकर, सोनाली पडवळे, सुखदा वढावकर आदींसह भाजपाच्या महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या तसेच विभागातील महिला उपस्थित होत्या.



भाजपा संपर्क कार्यालयासमोर संपन्न झालेल्या या हळदी कुंकू कार्यक्रमात नागोठणे शहर व विभागातील सुमारे ४५० महिलांनी मोठ्या प्रमाणात आपला सहभाग नोंदवला.

यावेळी हळदी कुंकू निमित्ताने भाजपा महिला मोर्चाच्या वतीने आलेल्या सर्व महिलांना तिळगुळ व एक आकर्षक भेटवस्तू देण्यात आली. याचबरोबर यावेळी नागोठणे भाजपा महिला मोर्चाच्या वतीने एक विशेष आकर्षण म्हणून महिलांसाठी छोटेखानी अशी उखाणे स्पर्धा घेण्यात आली. या उखाणे स्पर्धेत अनेक महिलांनी उखाणे घेऊन कार्यक्रम अधिक उत्साहवर्धक केला.उखाणे स्पर्धेत विजयी महिलांना मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आल्या.

# जेएनपीटी प्रशासन विरोधात जेएनपीटी स्थानिक प्रकल्पग्रस्त मजूर संस्था करणार तीव्र आंदोलन

**दै.रायगड नगरी । उरण**

आशिया खंडातील सर्वात महत्वाचे बंदर म्हणून जे एन पी टी बंदर (पोर्ट )जगप्रसिद्ध आहे. या जे एन पी टी सेझ मधील साफसफाईचे ६.८६ कोटीचे निघालेले काम मजूर संस्थांना विभागून द्या असे शिवसेनेचे नेते तथा मावळ मतदार संघाचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे, राष्ट्रवादीच्या नेत्या तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे यांनी जे एन पी टी प्रशासनाला पत्र दिले होते. मात्र जे एन पी टी सेझ मधील ६.८६ कोटीचे साफसफाईचे काम जे एन पी टी स्थानिक प्रकल्पग्रस्त मजूर संस्थांना विभागून न देता खाजगी ठेकेदारांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे खासदार व पालकमंत्री यांच्या आदेशाला जे एन पी टी प्रशासनाने केराची टोपली दाखवली आहे.उरण तालुक्यातील स्थानिक नागरिक असलेल्या जे एन पी टी स्थानिक प्रकल्पग्रस्त मजूर संस्था फेडरेशन या कामगार संघटनेवर अन्याय झाल्याने व या मजूर संस्थेच्या मागण्या मान्य न झाल्याने सदर संस्थेने जे एन पी टी प्रशासना विरोधात निदर्शने व आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जे एन पी टी (जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट )ह्या बंदराच्या प्रकल्पसाठी उरण तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या पिकत्या जमिनी कवडीमोल भावाने विकल्या. त्या बदल्यात जे एन पी टी प्रशासनाने शेतकऱ्यांना, प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते. तसेच ज्यांना नोकऱ्या मिळणार नाहीत त्यांना जे एन पी टी तसेच जे एन पी टी सेझ मधील साफसफाईची कामे मजूर संस्थेच्या रूपात देण्यात येईल असे ठरले होते. त्यानुसार गावोगावी मजूर संस्था स्थापन झाल्या. या मजूर संस्थांना २५ वर्षापूर्वी २५ लाखाचे कामे मिळत होती.सध्या २ वर्षापूर्वी २५ लाखाची किंमत वाढवून २ कोटी पर्यंतची साफसफाईची कामे मजूर संस्थांना देण्याचे ठरले त्यानुसार सदरचे काम मजूर संस्थेला द्यायला पाहिजे होते मात्र तसे झाले नाही. सद्यस्थितीत जे एन पी टी प्रशासनाने सेझ मध्ये रस्ता साफसफाईचे व बागकामाचे ६.८६ कोटीचे काम काढले आहे. मात्र हे काम मजूर संस्थेला न देता खाजगी ठेकेदाराला देण्यात आल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्त मजूर संस्था संतप्त झाल्या आहेत. सदर ठेकेदार साफसफाईच्या कामासाठी मशीनरी आणणार असल्याने १०० हुन जास्त प्रकल्पग्रस्तांचा रोजगार मिशीनरिमुळे बुडणार आहे. मशीन लावून साफसफाई होणार असल्याने शेकडो स्थानिक कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. त्यामुळे सदरचे काम जे एन पी टी स्थानिक प्रकल्पग्रस्त मजूर संस्था फेडरेशनला देण्यात यावे अन्यथा जे एन पी टी प्रशासना विरोधात तीव्र निदर्शने व आंदोलने करण्याचा इशारा सदर संघटनेचे अध्यक्ष जनार्दन भोईर, उपाध्यक्ष नरेंद्र ठाकूर, सचिव कुणाल घरत, सल्लागार –जे पी म्हात्रे यांनी दिला आहे.

# जनमत बोलतंय लोकशाहीत जनादेशावर निवडून येता मग अज्ञातवासात कशाला जाता

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायतीच्या १९ जानेवारी निवडणुक निकाला पासुन आता १० फेब्रुवारीला नगराध्यक्षपद निवडणुकी साठी जवळपास २३ दिवसांचा कालावधी मोठा नाट्यमय घटनांसाठी चर्चेत आला आहे. माणगांव विकास आघाडीच्या खात्यात ९ तर राष्ट्रवादीच्या खात्यात ८ नगरसेवक आहेत. चुकुन जरी एखादा इकडुन तिकडे फुटला तर पारड फिरायला टाईम लागणार नाही, अशी भिती व्यक्त होत आहे. उमेदवार आणि नेते अज्ञात–वासात गेले आहेत. कोणावरही विश्वास उरला नाही, त्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे.





अस म्हणतात पुन्हा एकदा खर्च करावा लागतोय, निवडणुक लढताना मतास अमुक एवढे, एकुण म्हणे लाखो खर्च करावे लागले, आणि आता लोकांनी कौल दिला पण सत्ता खुर्ची साठी कसरत करावी लागत आहे. लोकशाहीत जाहीर प्रचार करुन उजळ माथ्याने जनतेचे आशिर्वाद घेऊन निवडुन येता आणि नगराध्यक्षपद दृष्टीपथात असताना नगराध्यक्षपदाच्या प्रत्यक्ष निवडणुकीपूर्वी अशी ही बनवा–बनवी, पळवापळवी, लपाछपी, अज्ञात स्थळी लपून बसण्याची पाळी का येते, याचे प्रत्येकाने आत्मचिंतन करावे ! अस आता जनता बोलत आहे.

निवडणुकीत ज्या मतदार राजाच्या जिव–ावर, मतांवर निवडुन येता त्यांना आश्वासन देता आणि त्यांनाच गृहीत धरण्याचे खेळ सुरु झाले आहेत. आता मतदार राजालाही हे खेळ अंगवळणी पडले आहेत.

राजकारणाची अत्यंत दयनिय स्वार्थी प्रवृती आता निच्चतम पराकोटीला पोहचली आहे. खरतर मिळालेला मोकळा अवधी सत्कारणी लावावा, आपल्या मतदार संघातील जनतेच्या भेटी गाठी उजळ माथ्याने घ्याव्यात यासाठीच अज्ञात–वासात जाण्याचा कुटिल, रडका डाव आता बंद करा ! अस जनतेच स्पष्ट मत व्यक्त होत आहे.

निवडणुक जिंकली मग घाबरण्याचे कारण काय, लपून काय बसताय, ही कोणती लोकशाही ? स्वतः वरचा विश्वासच आपण गमावल्याचे हे द्योतक आहे. आपली ही नाटकं, खेळ जनता सगळ समजते, ये जो पब्लिक है वो सब जानती है.. तुम्हाला कोण पळवणार, तुम्ही मनात एकदा ठाम ठरवलत कि मतदान करणे तुमच्याच हाती आहे. निवडणुकी पूर्वी आघाडी करुन नंतर फोडाफोडी विकले जाऊन आपण पाच वर्ष स्वार्थ साधता, मग जनते साठी नगर सेवक म्हणुन समाजकारण सोयीनुसार करणाऱ्यांना यापुढे जनतेने राजकारणा–तुन हद्दपार करण्यासाठी आता नविन अध्यादेश काढावा लागेल कि काय ? अन्यथा अशा कुटिल मनोवृत्ती च्या लोकांकडुन समाज सेवेची काय अपेक्षा करणार, कसली समाजसेवा आणि कसले हे राजकारण चाललय? असा सवाल ऐरणीवर असुन या पळपूट्या प्रवृत्तीवर माणगांवात घराघरात चर्चा रंगली आहे.